**आत्महत्या**

आत्ममग्न आभाळाला हलकेच हाक मारा
अंधार सांडल्याचा येईल दोष सारा ।
भयनाट्य वादळाचे समजून घेई सारे
संवाद संपल्याचे देईल ते इशारे ।
धुसफूस झावळ्यांनी ठरवून केली सुरु
कंकाळ सावल्यांचे होईल तेथे पुरु ।
विचलित सागराला पडलेच प्रश्न फार
संन्यस्त अंतरंगी नेईल पैल पार ।
अदमास ना कुणाला, स्थिरचित्त शांती खरी
अंतास नक्की कोण, जाईल कुठवरी ? ।

**-- संध्या रानडे**